महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक -एमआयएस ०६१७/सीआर-५०/२०१७/तीन                                                    दिनांक ८ सप्टेंबर, २०२०

## -: प्रसिध्दीपत्रक :-

### विषय :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षाकरीता नकारात्मक गुणांच्या अंमलबजावणीसंदर्भात सुधारित कार्यपध्दती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरीता चार चुकीच्या उत्तराबददल एक गुण वजा करण्याबाबतची नकारात्मक गुणांची पध्दत सन २००९ मध्ये प्रथमत: लागू करण्यात आली. तदनंतर राज्य सेवा परीक्षेच्या संदर्भात नकारात्मक गुण वजा करण्याची कार्यपध्दती काही बदलासह अवलंबिवण्यात आली. सदर कार्यध्दतीचा आढावा घेण्यात आला. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरीता यापूर्वी अवलंबविण्यात येत असलेल्या सर्व कार्यपध्दती अधिक्रमित करुन यापुढे सर्व वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरीता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे :-

(१) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

(२) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.

(३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

(४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित असेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

२. उपरोक्त कार्यपध्दत आयोगामार्फत आयोजित सर्व स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा तसेच चाळणी परीक्षांकरीता लागू राहील.

३. सदर कार्यपध्दत यापुढे जाहीर होणाऱ्या सर्व लेखी परीक्षांच्या निकालाकरीता लागू राहील.

४. आयोगाच्या संकेतस्थळावरील संबंधित परीक्षांच्या परीक्षा योजनांमध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येतील. तोपर्यत उपरोक्त कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग